# जिल्हा परिषद ठाणे

थेट मुलाखत

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान कंत्राटी पदभरती सन २०२२-२३

नगरपरिषद अंबरनाथ व बदलापूर

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद ठाणे.

(करार दि.३१/०३/२०२३ पर्यंत)

| अ. क्र. | पदाचे नाव | नगर परिषद | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैदयकिय अधिकारी (Full Time) | यु.पी.एच.सी. खुंटवली, अंबरनाथ | ०१ | M.B.B.S. | रु. ६०,०००/- | — |
| | | यु.पी.एच.सी. कात्रप, बदलापूर | ०१ | | | |

**थेट मुलाखत** - दर महिन्याच्या १ व १५ तारखेला उमेदवार उपलब्ध होईपर्यंत. वेळ स.११.०० ते सायं ५.०० वा.
ठिकाण : आरोग्य विभाग, जिल्हा परिषद ठाणे (प.)

सही/-
अध्यक्ष
निवड समिती

जा.क्र./जिप/आवि/वशी/ /२०२२

**अटी व शर्ती:-**

१) **इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज** १) वयाचा पुरावा २) पदवी/पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षांचे प्रमाणपत्र) ३) गुणपत्रिका ४) कौन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable) ५) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे, ६) जात / वैधता प्रमाणपत्र इ.छायांकित प्रतींसह दर महिन्याच्या १ व १५ तारखेला उमेदवार उपलब्ध होईपर्यंत रोजी थेट मुलाखती करिता **आरोग्य विभाग, जिल्हा परिषद ठाणे (प.)** येथे उपस्थित रहावे.

२) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

३) लहान कुटुंबाची अट दि.२३/०७/२०२० पासून लागु करण्यात आली असून दि.२३/०७/२०२० पासून दोनपेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

४) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन, त्यांचा कालावधी अकरा महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी भरण्यात येणार आहेत. अथवा त्या आधी मंजुरी न मिळाल्यास पदे कधीही समाप्त करण्यात येतील.

५) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत.सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच यापदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

६) केंद्र / राज्य शासनाने संबंधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

७) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द् कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

८) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा. जर मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधून सादर केलेला असेल, परंतु सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवारांचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही .

९) राखीव संवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांनी त्या संवर्गाचे जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.जातीचे प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही .अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभही घेता येणार नाही.

१०) सहसंचालक ( अतांत्रिक) रा.आ.अ. मुंबई यांचे क्र. राआसो/ मनुष्यबळ/ आरक्षण /२४५६४-७७४/१६ दि.२०.०७.२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा गुणवत्तेनुसार विचार करण्यात येईल.

११) वैद्यकीय अधिकारी पदांकरीता तत्सम कौन्सिलकडील वैध नोंदणी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. कौन्सिल कडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. तथापी वैध्य प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल

१२) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१३) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांच्या सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१४) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१५) तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१६) उमेदवाराचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

१७) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

१८) भरती प्रक्रियेत पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रकियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी राखुन ठेवलेले आहेत

१९) कोविड-१९ साथ उद्रेक परिस्थितीस अनुसरुन मास्क व सॅनिटायझरचा वापर करावा व सामाजिक अंतराचे नियम पाळणे बंधनकारक आहे.

२०) वैद्यकिय अधिकारी (पूर्णवेळ) या पदाकरिता सदर भरतीप्रकियेत उमेदवार उपलब्ध न झाल्यास उमेदवार उपलब्ध होईपर्यंत दर महिन्याच्या १ व १५ तारखेला सकाळी ११.०० ते सायं ०५.०० या वेळेत उमेदवार आल्यास थेट मुलाखतीद्वारे निवड प्रक्रिया करण्यात येईल. तसेच १ व १५ तारखेस सार्वजनिक सुटटी असल्यास मुलाखतीस पुढील दिवशी उपस्थित रहावे.

२१) एक वर्ष अनुभव असल्यास एक गुण याप्रमाणे अनुभवाचे गुण दिले जातील.

२२) **इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज** १) वयाचा पुरावा २) पदवी/पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षांचे प्रमाणपत्र) ३) गुणपत्रिका ४) कौन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable) ५)शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे, ६) जात / वैधता प्रमाणपत्र इ. आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रतींसह मुलाखातीस हजर रहावे.

सदस्य सचिव

अध्यक्ष